PROSPECTUS




''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - कर्मवीर''

रयत शिक्षण संस्थेचे

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

**(स्वायत्त)** **(महाराष्ट्र)**



Reaccredited at 'A+' Grade by NAAC (CGPA : 3.51)
College with Potential for Excellence (CPE) Status Awarded by U.G.C
Lead College Status Awarded by Shivaji University, Kolhapur

**Phone :** 02162-234678, 226263 **Fax :** 02162-234678
**Estd. :** 1947
Email : principal.shivajicollege@gmail.com Website : www.cscsatara.com

**॥ संस्थापक ॥**

**पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील** (डी.लिट्)




OUR MISSION
LABORARE EST ORARE
CHHATRAPATI SHIVAJI COLLEGE, SATARA

**कनिष्ठ महाविद्यालय माहितीपत्रक**

रयत शिक्षण संस्थेचे,

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा



संस्थापक : कर्मवीर भाऊराव पाटील, डी. लिट्

## महाविद्यालयाच्या स्थापनेचा पूर्वइतिहास :

महाराष्ट्रातील सातारा या ऐतिहासिक शहरात कर्मयोगी आणि ज्ञानदानी भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षणाचे महाराष्ट्रातील पहिले रोपटे छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या रुपाने १९४७ मध्ये लावले आणि शैक्षणिक इतिहास निर्माण केला. आजवरचा या महाविद्यालयाचा इतिहास स्फूर्तिदायक आणि अभिमानास्पद असाच आहे. सर्व बाजूंनी नाडलेल्या रयतेला व दलितांना उच्च शिक्षणाची संजीवनी देऊन आदर्श नागरीक बनविण्याच्या तसेच विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने हे महाविद्यालय वसतिगृह पद्धतीवर चालविण्याचा त्यांनी निकराचा प्रयत्न केला. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात प्रचलित असलेल्या कमवा व शिका या योजनेचा फायदा घेऊन आपला सर्वांगिण विकास साधला.

विद्यार्थ्यांपुढे व समाजापुढे सोज्वळ आचार आणि दैदीप्यमान कर्तृत्वाचा आदर्श सातत्याने रहावा म्हणून कर्मवीरांनी या महाविद्यालयास शिवरायांचे नाव दिले. या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या संख्येबरोबरच गुणवत्तेचाही विकास झाला. सन १९५८ आणि १९५९ मध्ये या महाविद्यालयातील कला शाखेबरोबरच अनुक्रमे शास्त्र आणि वाणिज्य विद्या शाखा उघडण्यात आल्या.

या तिन्ही शाखांचा इतका विस्तार झाला की, जून १९६५ पासून या महाविद्यालयातील शास्त्र शाखा वेगळी करून तिचे स्वतंत्र असे सायन्स कॉलेजात रुपांतर करण्यात आले. पुढे जून १९७१ पासून या महाविद्यालयातील वाणिज्य शाखा वेगळी करून तिचे स्वतंत्र महाविद्यालयात रुपांतर करण्यात आले. सन १९७१ पासून या महाविद्यालयात कला शाखेचा विस्तार आणि विकास होत आहे.

सध्या या महाविद्यालयात ११ वी १२ वी असे दोन वर्ग जोडण्यात आले. या महाविद्यालयातील वरीष्ठ विभागातील बी. ए. भाग १ पासून एम. ए., एम. फील पर्यंतचे वर्ग धरुन होणारी विद्यार्थी संख्या ५००० पेक्षा जास्त आहे.

हे महाविद्यालय ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध अशा अजिंक्यताऱ्याच्या पूर्व पायथ्याशी निसर्गरम्य अशा वातावरणात असून महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर आकर्षक आहे. कॉलेजचा संपूर्ण परिसर उंच अशा टुमदार इमारतींनी व भोवतालच्या हिरव्यागार वृक्षांनी व्यापलेला आहे. कॉलेजातील निसर्गरम्य व सांस्कृतिक वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक असे आहे. इमारतीसमोर वर्तुळाकार बागेत कर्मवीर भाऊराव पाटील याचा अर्धपुतळा बसविला असून महाविद्यालयाच्या तीन मजली इमारतीसमोर शिवरायांचा पुतळा बसविला आहे.

## स्वावलंबी शिक्षण योजना : -

स्वावलंबी शिक्षण योजना हे महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्य आहे. कर्मवीरांनी सुरु केलेली ही योजना ध्येयनिष्ठेने राबविली जाते. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा फायदा घेऊन आपला सर्वांगीण विकास घडवून आणला आहे. महाराष्ट्रात या प्रकारची योजना रयत शिक्षण संस्थेने चालविलेल्या अनेक महाविद्यालयांमध्ये राबविली जाते. स्वावलंबी शिक्षण योजनेमुळेच कर्मवीर अण्णांच्या कार्याला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. या श्रमयोजनेद्वारे शिक्षणाची सामाजिक समतेशी व श्रमप्रतिष्ठेशी सांगड घालण्याचा कर्मवीरांनी यशस्वी प्रयत्न केला आहे. स्वावलंबी शिक्षण योजनेत गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी १ जुलैपूर्वी ठराविक नमुन्याचा अर्ज पूर्ण माहितीसह प्राचार्यांना सादर करणे आवश्यक आहे. हे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.



## ग्रंथालय अभ्यासिका : -

महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रशस्त अशा स्वतंत्र इमारतीत आहे ते सर्व विषयांच्या पुस्तकांनी समृद्ध आहे. क्रमिक पुस्तकांबरोबरच संदर्भ ग्रंथ व इतर सर्व प्रकारची नियतकालिकेही उपलब्ध आहेत. या ग्रंथालयात नाव नोंदविण्यासाठी आणि ओळखपत्रासाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालयात अर्ज करावा लागतो. ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्याला ग्रंथालयाचा फायदा घेता येणार नाही. कॉलेजच्या शिस्तीचा भाग म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र नेहमी जवळ बाळगणे आवश्यक आहे. ग्रंथालयात सर्व विषयांचे मिळून दीड लाखपेक्षा जास्त ग्रंथ असून दरवर्षी त्यात वाढ होत आहे. भारतीय व परदेशी नियतकालिकांची संख्या १०० पर्यंत आहे. आवश्यक असलेल्या पुस्तकांसाठी मागणी पत्रिका (डिमांड स्लिप) ग्रंथालयाकडे द्यावी लागते. आठवड्यातून दोनदा पुस्तके घेता येतात.

ग्रंथालयात गरीब विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढीची सोय करण्यात आली आहे. या योजनेनुसार पुस्तकाच्या मूळ किंमतीच्या २५% रक्कम ग्रंथालयात जमा केल्यास पुस्तके परीक्षेपर्यंत वापरण्याची सवलत मिळते. ग्रंथालयातून घेतलेली अशी पुस्तके परीक्षेनंतर ग्रंथालयात पुन्हा जमा करावी लागतात. दरवर्षी सुमारे १५०० विद्यार्थी या पुस्तक पेढीचा लाभ घेतात.

ग्रंथालयाला लागूनच अभ्यासिकेची सोय करण्यात आली आहे. या अभ्यासिकेत क्रमिक पुस्तके नियतकालिके व प्रश्नपत्रिका ठेवलेल्या असतात. सकाळी ७ ते सायं. १० पर्यंत ही अभ्यासिका सुरु असते.

## वसतिगृहे : -

महाविद्यालयात विद्यार्थीनींसाठी सर्वसोईनीयुक्त अशी वसतिगृहे आहेत. विद्यार्थीनी वसतिगृहात २०० मुलींना प्रवेश दिला जातो. या वसतिगृहात मुलींची राहण्याची व भोजनाची व्यवस्था आहे. विद्यार्थीनींची आरोग्याची काळजी घेतली जाते.

वसतिगृहाचे वार्षिक शुल्क जुनी इमारत ९५००/- रू. व नवीन इमारत १५०००/- रू. आहे. फक्त मुलींसाठी भोजनाची व्यवस्था आहे. भोजन बिल अलग द्यावे लागेल. वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनींना कॉलेजमध्ये प्रवेश घेतेवेळी प्राचार्यांकडे स्वतंत्र अर्ज करावा लागतो. हे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात मिळतात. प्रवेश अर्ज छाननी केल्यानंतर विद्यार्थीनींच्या मुलाखती घेतल्या जातात व नंतर प्रवेश दिलेल्या विद्यार्थीनींची यादी नोटीस बोर्डवर लावली जाते.

या वसतिगृहात विद्यार्थीनींवर देखरेख ठेवण्यासाठी प्राध्यापकांच्या दर्जाच्या निरीक्षकाची नेमणूक केली जाते. वसतिगृहातील इतर कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी प्रमुख निरीक्षक असतात. निरीक्षक विद्यार्थीनींच्या शिस्तीवर व अभ्यासावर सतत लक्ष ठेवतात. विद्यार्थीनींना वसतिगृहात प्रवेश देणे, गैरशिस्तीबद्दल कारवाई करणे याबद्दलचे अधिकार प्राचार्यांकडे सोपविले आहेत.

# PRINCIPAL'S DESK

Chhatrapati Shivaji College Was Founded In June 1947 by The Visionary educationist Dr. Karmaveer Bhaurao Patil with a view to opan the vistas of higher education for the people from mofussil areas of maharastra. the history college is an inspriation by itself he started the college as Free and residential' later on from 1951 due to some difficulties it was decided to charge fees. It was the time when the growth of higher education needed strong.and

The economic stresses would come in the way of seeking higher education. Karmaveer offered a precious solution to this problem by introducing " Earn and Learn Scheme' for the needy students from economically and socially depressed classes of society. Since its very inception the College has been striving to educate and mpower the rural sections of society.

Chhatrapati Shivaji College promotes'quality education in response o the changing scenario of socity. as per its mission and core values it imparts ecular, liberal, progressive education to the rural students. It inculcates luralistic and multicultural outlook among students for healthy society. This as resulted in producing good number of citizens, political leaders, activists ocial workers, officers, teachers, lawyers and administrative officers in Maharashtra.

Chhatrapari Shivaji College, Satara is accredited inthe Third Cycle of ccreditation at 'A+' grade by National Assessment and Accredition Council Banglore with CGPA of 3.51 in 2017. The University Grants Commission has warded the college the status of 'College with Potential for Excellence and Shivaji University, Kolhapur has awarded the status of Lead College'

The college executes the curriculum effectively. it has upgraded eaching learning and evaluation. It has enhanced the research potential of aculty and student.The student centric activities have supported the tudents and also resulted into their progression towards further education. The NCC and nss units try to nurture various abilities of students. The earning resources and infrastructure have played crucial role in the evelopment of the college The college has followed the policy of inclusive ducation through its "Earn and Learn Scheme" The infrastructure is eveloped as per the needs and the availabilities of funds to make the earning resources rich. The high number of merit holders and rankers eflects the outcomes of teaching learning, evaluation.From its inception 680 tudents are selected through Prin. Mrs. Sumatibai Patil and Barr. P. G. Patil Competitive Examinations Gudance Centre. The college has received wards for its magazine shivaji as the best magazine of Shivaji University.We re proud of our success in sports also. Our Student have bagged medals nd award at state and national level.

Our future plans include efforts for getting the status of College with Excellence We take efforts for fulfilling our Sanstha's vision of educating the ouths and inculcating 'Rayat Culture* in them I welcome you to be the part of his Culture and witness the development of this college. I welcome you to be he Part of this Culture.



प्राचार्य
डॉ.व्ही.एस.शिवणकर

# प्राचार्यांचा संदेश

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील बहूजन समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जून १९४७ मध्य छत्रपती शिवाजी कॉलेजची स्थापना केली. सुरूवातीला हे महाविद्यालय मोफत आणि निवासी होते. 'कमवा व शिका' या योजनेमध्ये प्रवेश घ्यावा लागत असे. तथापि सन १९५१ मध्ये सातारा शहरातील काही मान्यवरांनी कर्मवीरांना विनंती केली की इतर विद्यार्थ्यांनाही फी भरून प्रवेश देण्यात यावा. त्याप्रमाणे पुढे सदर महाविद्यालय सर्व विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आले तेव्हापासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बौध्दीकदृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी कॉलेजच्या माध्यमातून केला जात आहे.

बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी कॉलेजने आपल्या शैक्षणिक धोरणांमध्ये सकारात्मक बदल केल्यामुळे उच्च दर्जाच्या मूल्यांबरोबरच धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद आणि पुरोगामी विचारांची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली जातात त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, प्रशासकीय क्षेत्राबरोबर शिक्षक, प्राध्यापक, वकील अशा प्रकारचे सर्वोच्च मनुष्यबळ निर्माण करण्यात महाविद्यालयाने महत्वाची भूमिका बजावली आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती समिती, बेंगलोर(नॅक) यांनी महाविद्यालयाच्या तिसऱ्या राष्ट्रीय मूल्यांकनामध्ये ( C.G.P.A.3.51)A+ हे सर्वोच्च मानांकन दिले आहे. तर विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालात CPE हा दर्जा दिला आहे. तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज हे गेली अनेक वर्ष शिवाजी विद्यापीठाचे लीड कॉलेज म्हणून नेतृत्व करीत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विद्यापीठीय अभ्यासक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी आणि संशोधनासाठी पोषक वातावरण निर्माण केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौध्दीक आणि संशोधनात्मक क्षमता विकसित होण्यास मदत झाली आहे. याशिवाय केवळ आर्थिक परिस्थिती नाही म्हणून कोणत्याही विद्यार्थ्यांचा शैक्षणिक हक्क नाकारला जाऊ नये यासाठी कमवा व शिका योजना अत्यंत प्रभावीपणे राबविली जाते. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेची तीन युनिट्स कार्यरत असून त्यामाध्यामातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची मुल्ये रूजविली जातात तर राष्ट्रीय छात्र सेनेच्या (NCC) माध्यामातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभिमानाची भावना विकसित केली जाते.

महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र हे आमचे आणखी एक शक्तीस्थळ आहे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र म्हणून आमच्या केंद्राने लौकिक प्राप्त केला आहे. आजपर्यंत या स्पर्धा परीक्षा केंद्रामधून महाराष्ट्राच्या प्रशासकीय सेवेमध्ये ६८० अधिकारी समाविष्ट झाले आहेत.

पुढील पाच वर्षामध्ये महाविद्यालयाचा महत्वाकांक्षी उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये सर्वोत्कृष्ट दर्जाची गुणवत्ता प्राप्त करणे आणि विद्यार्थ्यांवर रयत संस्कृतीचा संस्कार करून समाजाला उत्कृष्ट मानव संसाधन निर्माण करण्याचा प्रयत्न अविरतपणे केला जात आहे. तुम्ही या संस्कृतीचा भाग आहे. म्हणून मी तुमचे स्वागत करतो.

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

*The Executive Committee of the*
*National Assessment and Accreditation Council*
*on the recommendation of the duly appointed*
*Peer Team is pleased to declare the*
*Rayat Shikshan Sanstha's*

*Chhatrapati Shivaji College*

*Sadar Bazaar Camp, Dist. Satara, affiliated to Shivaji University, Maharashtra as*

*Accredited*

*with CGPA of 3.51 on seven point scale*
*at A+ grade*
*valid up to October 29, 2022*

*Date : October 30, 2017*

*Director*

EC(SC)/28/A&A/51.3

# VISION

- To provide quality education to youth and inculcate 'Rayat Culture' in them for their all-round development.

# MISSION

- To impart value based education to make the students responsible citizen

# GOALS

- To impart higher education to the youths from the mofussil areas with a view to enable them, awaken the masses educationally, socially, culturally and intellectually.
- To inclucate the dignity of labour and self-reliance in the students.
- To facilitate the boon of higher education for the women deprived of their legitimate right to such education.
- To promote all-round personality development of the students through curricular and extra curricular programmes and activities.
- To enhance mutual understanding, co-operation and secular outlook of the student community.
- To channelise creative and academic energies of students towards enabling them to keep pace with the challenges of time.

# संकल्प / भविष्यवेध

- तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे व त्यांच्यामध्ये रयत संस्कृती रुजवणे.

# मिशन

- विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक घडविण्यासाठी मूल्य शिक्षण देणे.

# ध्येये

- ग्रामीण व दुर्गम भागातील तरुणांना शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व बौद्धिक दृष्टीने जागृत करण्यासाठी उच्च शिक्षण देणे.
- विद्यार्थ्यांच्या मनामध्ये श्रमप्रतिष्ठा व स्वावलंबन याचे महत्त्व रुजविणे.
- शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहिलेल्या स्त्रियांपर्यंत उच्चशिक्षणाचा लाभ पोहचविणे.
- अभ्यासक्रमाशी निगडीत व अभ्यासक्रम बाह्य कार्यक्रम व उपक्रमांच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये परस्पर सामंजस्य, सहकार्य आणि धर्मनिरपेक्ष दृष्टीकोण विकसित करणे.
- सद्यस्थितीतील आव्हानांचा सामना करण्याच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशील आणि शैक्षणिक उर्जेला प्रवाहित करणे.

## क्रीडा विभाग (जिमखाना) : -



या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या शारीरिक विकासावर विशेष लक्ष दिले जाते. यासाठी महाविद्यालयात स्वतंत्र क्रीडा विभाग (जिमखाना) आहे. देशी आणि विदेशी खेळांचे प्रशिक्षण देण्यासाठी, खेळामध्ये विशेष प्राविण्य मिळविण्यासाठी शारीरिक शिक्षणतज्ज्ञ क्रीडा संचालकांची नेमणूक करण्यात आली आहे.

निरनिराळ्या खेळांच्या सरावासाठी महाविद्यालयाच्या परिसरात विस्तृत असे क्रिडांगण आहे. या क्रिडांगणावर क्रिकेट, हॉकी, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी इ. मैदानी खेळाची सोय आहे. महाविद्यालयात स्वतंत्र असे बॅडमिंटन कोर्ट असून त्याचे विशेष प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय टेबल-टेनिस, कॅरम, मल्लखांब तसेच ज्युदो, कुस्ती यासाठी मॅटची सोय उपलब्ध केलेली आहे.

निरनिराळ्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांचा विकास होण्यासाठी दरवर्षी शालेय, जिल्हा विभाग व राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी विद्यार्थी पाठविले जातात. महाविद्यालयाच्या आवारात पोहण्याचा तलाव बांधण्यात आला आहे. हा तलाव सर्वसोईंनी परिपूर्ण असून त्यात पोहण्याच्या स्पर्धा घेतल्या जातात.

## राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) : -

१९५४ पासून महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना प्रशिक्षणाची सोय करण्यात आली आहे. पूर्वी हा विभाग कोल्हापूर येथे राष्ट्रीय छात्र सेना विभागाशी जोडण्यात आला होता. परंतु १९६० पासून २२ महाराष्ट्र बटालियन सातारा या नावाने स्वतंत्र विभाग करण्यात आला आहे. २२ महाराष्ट्र बटालियन कोल्हापूर ग्रुपशी संलग्न आहे. एकूण १०५ विद्यार्थी दरवर्षी छात्र सेना विभागात प्रवेश घेतात. छात्र सैनिकांची बी व सी सर्टिफिकेट परीक्षेची विशेष तयारी करून घेतली जाते. राष्ट्रीय छात्र सेना विभागात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या प्रमुखांशी संपर्क साधावा.

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) : -

या कनिष्ठ महाविद्यालयात सन १९९७-९८ पासून मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांच्या मान्यतेनुसार इ. ११ वी वर्गास ५० व इ. १२वी वर्गास ५० याप्रमाणे एकूण १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो प्रकल्प अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## प्रौढ आणि निरंतर शिक्षण : -



शिवाजी विद्यापिठाच्या वतीने प्रौढशिक्षण, निरंतर शिक्षण, जनशिक्षण, निलायम इ. कार्यक्रम राबविले जातात. या विभागातील उल्लेखनय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांस महाविद्यालयाचे प्रशस्तिपत्र दिले जाते.

## कर्मवीर भाऊराव पाटील स्मृती ढाल वक्तृत्व स्पर्धा : -

पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक फिरती ढाल ठेवण्यात आली आहे. यासाठी दरवर्षी या महाविद्यालयातील पहिल्या सत्राच्या शेवटी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या जातात. यात उत्स्फूर्त व तयारीची भाषणे आयोजित केली जातात. दरवर्षी महाराष्ट्रातील बहुतेक सर्व महाविद्यालये या स्पर्धेत भाग घेतात. पहिला क्रमांक पटकाविणाऱ्या महाविद्यालयाला ढाल दिली जाते. तसेच व्यक्तिगत बक्षिसेही दिली जातात.

## इतर वक्तृत्व व निबंध स्पर्धा : -

या महाविद्यालयातून तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर विविध ठिकाणी वक्तृत्व, निबंध, कथाकथन, वादविवाद, कविता इ. स्पर्धांसाठी गुणवान विद्यार्थ्यांची निवड केली जाते व स्पर्धात सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या गरीब व होतकरू व पात्र विद्यार्थ्यांना केंद्र व महाराष्ट्र सरकारमार्फत मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या व सवलती उपलब्ध करून दिल्या जातात. अशा सवलतींची व शिष्यवृत्त्यांची यादी पुढे दिली आहे.

१) ई. बी. सी. फ्रीशिप
२) बी. सी. फ्रीशिप
३) मिलीटरी सर्व्हिसमनच्या मुलांना फ्रीशिप
४) रयत शिक्षण संस्था फ्रीशिप
५) प्राथमिक शिक्षकांच्या मुलामुलींसाठी फ्रीशिप
६) वॉर एज्युकेशन कन्सेशन
७) नॅशनल मेरिट स्कॉलरशिप
८) राष्ट्रीय संस्कृत संस्थान (भारत सरकार) नवी दिल्ली यांच्याकडील संस्कृत शिष्यवृत्ती
९) गव्हर्मेंट ओपन मेरिट स्कॉलरशिप
१०) बी. सी. स्कॉलरशिप
११) ई.बी.सी. स्कॉलरशिप
१२) नॅशनल लोन स्कॉलरशिप
१३) फ्रीडम फायटर स्कॉलरशिप
१४) अपंग मुलांसाठी स्कॉलरशिप
१५) हिंदी स्कॉलरशिप
१६) युनिव्हर्सिटी स्कॉलरशिप
१७) अस्पृश्य, गिरिजन, विमुक्त जाती व अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना सवलती.
१८) महाविद्यालयातील पारितोषिके व सवलती

वर दिलेल्या शिष्यवृत्त्या व सवलती विषयाची निवेदने वेळोवेळी सूचना फलकावर लावली जातात. संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीच्या आत कार्यालयातील संबंधित लिपिकाशी संपर्क साधून ज्या त्या विषयाची सविस्तर माहिती मिळवावी.

## कार्यालयाची वेळ : -

सकाळी १०.३० पासून सायंकाळी ५.३०

## लेखाविभाग (Account Section) :

सकाळी ११.०० पासून दुपारी ३.०० पर्यंत

## सत्राचा कालावधी :

पहिले सत्र : शासनआदेशानुसार सुरू होईल (यामध्ये विद्यापीठाच्या वेळापत्रकनुसार बदल होऊ शकतो)

शिवाजी विद्यापीठाने ठरवून दिल्याप्रमाणे महाविद्यालयाची सत्रे व सुट्ट्या यांबाबत सूचनाफलकावर वेळोवेळी नोटीस लावली जाईल.

## कनिष्ठ महाविद्यालय पहिले वर्ष (इयत्ता ११ वी)

### प्रवेश घेण्याबाबतचे नियम : -

खालील अटींची पूर्तता केलेल्या विद्यार्थ्यांनाच कनिष्ठ महाविद्यालयाच्या पहिल्या वर्गाला (इयत्ता ११ वी ला) प्रवेश दिला जाईल.

१) भारतातील कोणत्याही सरकारमान्य परीक्षा मंडळाने नवीन आकृतीबंधानुसार घेतलेल्या १0 वी च्या परीक्षेत इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास कनिष्ठ महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षाला (इयत्ता ११ वी त) प्रवेश घेता येईल.

२) विदर्भ व मराठवाडा सरकारमान्य परीक्षा मंडळाने जुन्या अभ्यासक्रमानुसार घेतलेल्या इयत्ता ११ वी च्या परीक्षेत इंग्रजी विषय घेऊन पास होणाऱ्या विद्यार्थ्याला प्रवेश घेता येईल.

३) जुन्या अभ्यासक्रमानुसार पश्चिम महाराष्ट्रातील एस.एस.सी. बोर्डाने घेतलेल्या इयत्ता १0 वीच्या परीक्षेत इंग्रजी विषय घेऊन पास होणाऱ्या विद्यार्थ्याला पहिल्या वर्षाला प्रवेश घेता येईल.

४) महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठाने घेतलेल्या पी.यू.सी. किंवा प्री.डिग्री किंवा एफ.वाय.बी.ए. या परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्याला मराठवाडा विदर्भ (१९७६ व १९७७ सालापासून) व पश्चिम महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या (१९७७ ते १९७८ सालापासून) पहिल्या वर्षाला प्रवेश दिला जाईल.

५) इंटिग्रेटेड आकृतीबंधानुसार (९वी, १0वी, ११वी) इयत्ता १0 वी पास झालेल्या विद्यार्थ्याला पहिल्या वर्षाला प्रवेश दिला जाईल. तथापि नवीन आकृतीबंधानुसार इयत्ता १0वी च्या सप्लीमेंटरी परीक्षेला बसावे लागेल. या परीक्षेत पास झाल्याशिवाय त्याला महाविद्यालयाकडून घेतल्या जाणाऱ्या पहिल्या वर्षाच्या वार्षिक परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही.

६) इंडियन सर्टीफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशनची (आय.सी.एस.ई.) परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्याला पहिल्या वर्षाला प्रवेश घेता येईल.

७) नवी दिल्ली येथील सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनची ११वी ची (हायर सेकंडरी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला पहिल्या वर्षाला प्रवेश घेता येईल.

८) इयत्ता १0 वी च्या मार्च च्या परीक्षेत सर्व विषय घेऊन बसलेल्या व एक किंवा दोन विषयांत नापास असलेल्या विद्यार्थ्यास शासकीय नियमानुसार ए.टी.के.टी. म्हणून इ. ११ वी ला तात्पुरता प्रवेश दिला जाईल. परंतु सदर विद्यार्थ्याने नजीकच्या दोन परीक्षेत (जुलै व मार्च) इयत्ता १0 वी च्या अनुत्तीर्ण विषयाच्या परीक्षेस बसून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची इ. ११ वी ची प्रवेश संपादणूक रद्द समजली जाते.

१ ते ८ यापैकी कोणतीही एक अट पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याने पहिल्या वर्षाला प्रवेश घेण्यासाठी ठराविक नमुन्यातील छापील अर्ज योग्य ती माहिती भरून प्रवेश शुल्कासह सादर करावा. या अर्जासोबत खालील दाखले जोडावेत.

१) प्रवेश अर्जावर स्वतःचा सध्याचा आयडेंटीटी साईझ फोटो ग्रंथालय कार्ड व ओळखत्रासाठी दोन फोटो आवश्यक आहेत.

२) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व झेरॉक्स प्रत

३) मूळ गुणपत्रक व त्याची सत्यप्रत

४) इ. ११ वी मध्ये ए.टी.के.टी. म्हणून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी इ. १0 वी चे मूळ बोनाफाईड सर्टिफिकेट व त्याची सत्यप्रत, तसेच मूळ गुणपत्रक व त्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. ५) आधार कार्डच्या २ सत्यप्रत

**सूचना :** इ. ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दाखला व गुणपत्रकाच्या आवश्यक तेवढ्या झेरॉक्स स्वतःकडे काढून घ्याव्यात व त्या सर्व प्रती प्रमाणित करून घ्याव्यात.

इयत्ता ११ वी चा अभ्यासक्रम (विषय)

मराठी माध्यम : ११ वी साठी ४ आवश्यक व ४ ऐच्छिक असे एकूण ८ विषय घ्यावे लागतील.

**अ) आवश्यक विषय :**

१) इंग्रजी २) मराठी ३) पर्यावरण शिक्षण ४) आरोग्य व शारीरिक शिक्षण

**ब) ऐच्छिक विषय :** खालीलपैकी प्रत्येक गटातून एक विषय असे एकूण चार गटांतून चार ऐच्छिक विषय विद्यार्थ्यांने निवडणे आवश्यक आहे.

| गट क्र. | विषय |
|---|---|
| १. | इतिहास / संस्कृत / प्राकृत |
| २. | भूगोल / सहकार |
| ३. | मानसशास्त्र / अर्थशास्त्र |
| ४. | हिंदी / राज्यशास्त्र / समाजशास्त्र |

प्रवेश अर्जात ऐच्छिक विषयांची नावे सुवाच्च अक्षरांत लिहावीत, एकदा निवडलेले विषय प्राचार्यांच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाहीत.

इ. ११ वी मधील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे सक्तीचे चार व निवडलेल्या ऐच्छिक चार अशा आठ विषयाची सत्र - १ व सत्र - २ मध्ये परीक्षा द्यावी लागेल. परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल याची नोंद घ्यावी.

### उच्च माध्यमिक पुनर्रचित अभ्यासक्रम मुल्यांकन योजना

#### इ. १२ वी मुल्यमापन आराखडा

| प्रथम मध्य सत्र | सहामाही परीक्षा | सराव / बोर्ड परीक्षा | | |
|---|---|---|---|---|
| लेखी<br>५0 गुण | लेखी<br>५0 गुण | लेखी<br>८0 गुण | तोंडी<br>२0 गुण | एकूण<br>१00 गुण |

| पर्यावरण व जलसुरक्षा | | | आरोग्य व शा.शिक्षण | | |
|---|---|---|---|---|---|
| जर्नल कार्य<br>२५<br>गुण | प्रात्यक्षिक कार्य<br>२५<br>गुण | एकूण<br>५0<br>(ग्रेडमध्ये) | जर्नल कार्य<br>२५<br>गुण | प्रात्यक्षिक<br>२५<br>गुण | एकूण<br>५0 गुण<br>(ग्रेडमध्ये) |

# कनिष्ठ महाविद्यालय दुसरे वर्ष (इयत्ता १२ वी)

## प्रवेश घेण्यासंबंधीचे नियम :-

अ) महाराष्ट्र राज्यातील किंवा भारतातील कोणत्याही राज्यातील उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने ठरवून दिलेल्या १०+२+३ या नवीन आकृतिबंधानुसार इ. ११वी ची किंवा ज्युनिअर कॉलेजच्या पहिल्या वर्षाची पब्लिक परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला दुसऱ्या वर्षाला (इ. १२ वी) ला प्रवेश दिला जाईल.

ब) पब्लिक परीक्षेच्या सदरात मोडणाऱ्या परंतु भारतातील इतर राज्यातील त्याच दर्जाची परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्याला ज्युनिअर कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला (इ. १२ वी ) ला प्रवेश दिला जाईल परंतु अशा विद्यार्थ्याला त्या राज्याच्या संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्याच्या सहीचे ट्रान्सफर सर्टीफिकेट प्रवेशाचे वेळी सादर करावे लागेल.

क) कमर्शिअल डिप्लोमा परीक्षा किंवा त्याच दर्जाची परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्याला आर्टस् किंवा कॉमर्स विद्याशाखेतील ज्युनिअर कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश घेता येईल. (टीप : गव्हर्नमेंट कमर्शिअल सर्टीफिकेट परीक्षेत पास होणारा विद्यार्थी मात्र दुसऱ्या वर्षात प्रवेश घेण्यास पात्र समजला जाणार नाही.)

ड) सातारा शहरातील अन्य महाविद्यालयातून इ. ११ वी कला शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना स्थानिक स्थलांतर या नियमानुसार इ. १२ वी वर्गास प्रवेश दिला जाणार नाही.

## इयत्ता १२ वी चा अभ्यासक्रम (विषय) :-

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेसाठी प्रत्येकी १०० गुणांचे आठ विषय निवडावे लागतात. त्यापैकी चार विषय आवश्यक व चार ऐच्छिक असतात. इ. ११ वी ला अन्य ज्युनिअर कॉलेजमधून आलेल्या विद्यार्थ्यांनाही पुढीलप्रमाणे विषय घ्यावे लागतात.

### अ) आवश्यक विषय : -

१) इंग्रजी २) मराठी ३) पर्यावरण शिक्षण ४) आरोग्य व शारीरिक शिक्षण

**ब) ऐच्छिक विषय :** खालीलपैकी प्रत्येक गटातून एक विषय असे एकूण चार गटांतून चार ऐच्छिक विषय विद्यार्थ्यांने निवडणे आवश्यक आहे.

| गट क्र. | विषय |
|---|---|
| १. | इतिहास / संस्कृत / प्राकृत |
| २. | भूगोल / सहकार |
| ३. | मानसशास्त्र / अर्थशास्त्र |
| ४. | हिंदी / राज्यशास्त्र / समाजशास्त्र |

शैक्षणिक वर्षात इ. १२ वी मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सक्तीचे व ऐच्छिक विषय निवडून सदरचे विषय प्रवेश अर्जावरती लिहून त्यांचे संबंधित असणारे विषय कोड नंबर लिहावेत.

| | सक्तीचे विषय | विषय कोड नंबर |
|---|---|---|
| १. | मराठी | ०२ |
| २. | इंग्रजी | ०१ |
| ३. | पर्यावरण शिक्षण | ०३ |
| ४. | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ३० |

ऐच्छिक विषय (प्रत्येक ग्रुपमधील एक विषय निवडण्यात यावा.)

| | | |
|---|---|---|
| ४. | इतिहास | ३८ |
| | संस्कृत | ३३ |
| | अर्धमागधी | १६ |
| ५. | भूगोल | ३९ |
| | सहकार | ५३ |
| ६. | मानसशास्त्र | ४८ |
| | अर्थशास्त्र | ४९ |
| ७. | समाजशास्त्र | ४५ |
| | राज्यशास्त्र | ४२ |
| | हिंदी | ०४ |

## पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्रे :-

भारतातील महाराष्ट्राशिवाय इतर राज्यातील उच्च माध्यमिक मंडळाने घेतलेल्या परीक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेताना प्रवेश अर्जासोबत पात्रता प्रमाणपत्र व स्थलांतराचा दाखला सादर करावा लागेल. पात्रता प्रमाणपत्रासाठी विभागीय सचिवांकडे बोर्ड नियमानुसार फी भरून अर्ज करावा. कागदपत्रांची पूर्तता व पात्रता प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

## परीक्षा :

### अ) इयत्ता ११ वी (कनिष्ठ महाविद्यालयाचे पहिले वर्ष)

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कनिष्ठ महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षाच्या (इयत्ता ११ वी च्या) परीक्षा महाविद्यालयाकडून घेतल्या जातील.

पहिली सत्र परीक्षा पहिल्या सत्राच्या शेवटी (ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात) व दुसरी सत्र परीक्षा दुसऱ्या सत्राच्या शेवटी म्हणजे मार्च-एप्रिल महिन्यात घेतली जाईल.

सत्र परीक्षा व घटक चाचण्या यांच्या सूचना वेळोवेळी फलकावर लावण्यात येतील. या सूचना काळजीपूर्वक वाचून प्रत्येक विद्यार्थ्याने सत्र परीक्षा व घटक चाचण्या यांना उपस्थित रहावे.

दुसऱ्या वर्षात प्रवेश घेण्यास पात्र होण्यासाठी शैक्षणिक वर्षाच्या एकूण दिवसांपैकी कमीत कमी ७५% दिवस प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी आवश्यक आहे. यापेक्षा कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांचा दुसऱ्या वर्षाच्या प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

### ब) इयत्ता १२ वी (कनिष्ठ महाविद्यालय-दुसरे वर्ष)

इयत्ता १२ वी ची वार्षिक परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी/मार्च महिन्यात घेतली जाईल. या परीक्षेत नापास होणाऱ्या किंवा काही

कारणामुळे परीक्षेस बसू न शकलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा जुलै महिन्यात घेतली जाईल. या परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षा केंद्र या विषयीची माहिती सूचना फलकावर लावण्यात येईल.

पहिले सत्र सुरू झाल्यापासून १५ फेब्रुवारीपर्यंत शैक्षणिक कामाच्या एकूण दिवसांपैकी किमान ७५% दिवस हजर असणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म स्वीकारले जातील. यापेक्षा कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या १२ वीच्या परीक्षेला बसता येणार नाही.

वार्षिक परीक्षेशिवाय महाविद्यालय सहामाही व सराव परीक्षा घेईल. त्यापैकी सहामाही परीक्षा पहिल्या सत्राच्या शेवटी व पूर्व परीक्षा जानेवारी-फेब्रुवारीमध्ये घेतली जाईल. प्रत्येक विषयांची ८० गुणांची परीक्षा घेतली जाईल.

## महाविद्यालयाची शिस्त पालनासंबंधी नियम :

१) विद्यार्थी विद्यार्थिनींना गणवेश अनिवार्य आहे.

२) महाविद्यालय व महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ ओळखपत्र (आयडेंटीटी कार्ड) बाळगले पाहिजे. ओळखपत्र हरविल्यास डुप्लिकेट ओळखपत्र घेण्याची पद्धत क्लिष्ट आहे. त्यासाठी ओळखपत्र काळजीपूर्वक सांभाळावे.

३) सर्व प्रकारची वाहने निर्धारीत स्टँडमध्ये लावण्यात यावीत. राऊंड गार्डन भोवती तसेच महाविद्यालयातील मैदानावर वाहने फिरविण्यास सक्त मनाई आहे.

४) महाविद्यालय परिसरात मोबाईल वापरास सक्त मनाई आहे.

५) महाविद्यालयातील तास सुरू असताना व्हरांड्यात फिरू नये.

६) विद्यार्थ्यांनी सर्व तासांना आणि परीक्षांना नियमितपणे हजर राहिले पाहिजे. शासन नियमानुसार ज्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५% पेक्षा कमी असेल त्यांचे परीक्षा अर्ज पाठविले जाणार नाहीत. पूर्व परवानगीशिवाय सलग एक महिन्यापेक्षा अधिक काळ गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव कमी करण्यात येईल व अशा विद्यार्थ्यांकडून संपूर्ण वर्षाचे शुल्क वसूल केले जाईल.

७) सूचना फलकावर लावण्यात येणाऱ्या सूचना नियमितपणे वाचाव्यात. सूचना फलकावरील सूचना न वाचल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

८) महाविद्यालयाने आयोजित केलेल्या वेगवेगळ्या परीक्षांना बसणे विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे. गैरहजर विद्यार्थ्याला दंड आकारला जाईल.

९) महाविद्यालयाने आयोजित केलेल्या जादा तासांना विद्यार्थ्याने उपस्थित राहणे सक्तीचे आहे. गैरहजर विद्यार्थ्यांला दंड केला जाईल.

१०) विद्यार्थ्यांकडून खालीलपैकी कोणताही गैरप्रकार घडल्यास त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करून त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

अ) कोणत्याही अभ्यासक्रमासाठी बनावट वा चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे प्रवेश घेणे तसेच चुकीची वा खोटी माहिती देऊन सवलत मिळवणे.

ब) महाविद्यालयाच्या कामकाजात अडथळा येईल असे कोणतेही कृत्य करणे.

क) महाविद्यालयाच्या आवारात घातक शस्त्र, स्फोटके, ॲसिड यांसारखे पदार्थ स्वतः जवळ बाळगणे.

ड) कोणतेही मादक पदार्थ स्वतःजवळ बाळगणे किंवा त्यांचे सेवन करणे.

इ) महाविद्यालयाच्या आवारात कोणत्याही विद्यार्थ्याला रॅगिंग करणे, दम देणे वा छळ करणे.

प) महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कोणत्याही कार्यक्रमाच्या, खेळाच्या किंवा स्पर्धेच्या वेळी हुल्लडबाजी करणे.

ज) महाविद्यालयाच्या आवारात कोणत्याही प्रकारच्या मारामारीच्या, दहशतीच्या, धमकीच्या किंवा मुलींचे छेड काढण्याच्या कृत्यात सामील असणे.

झ) महाविद्यालयाच्या मालमत्तेची हानी किंवा चोरी करणे.

११) आपल्या जाणीवपूर्वक वा अजाणता केलेल्या कृत्याने रयत शिक्षण संस्था आणि हे महाविद्यालय यांच्या नावलौकिकास व प्रतिष्ठेस बाधा पोहचेल असे विद्यार्थ्यांचे वर्तन असू नये.

१२) या नियमांमध्ये बदल करण्याचा मा. प्राचार्यांचा अधिकार राहील.

* * *

## ज्युनिअर कॉलेज फी माहिती पत्रक

### वर्ष : २०२१-२०२२ अनुदानित

| अ. क्र. | तपशील | अकरावी | | | बारावी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शिष्यवृत्ती घेणारे विद्यार्थी | सवलत घेणारे विद्यार्थी | सवलत न घेणारे विद्यार्थी | शिष्यवृत्ती घेणारे विद्यार्थी | सवलत घेणारे विद्यार्थी | सवलत न घेणारे विद्यार्थी |
| १. | प्रवेश फी | - | - | १६ | - | - | १८ |
| २. | शिक्षण फी | - | - | १९२ | - | - | २१६ |
| ३. | टर्म फी | - | - | ३२ | - | - | ३६ |
| ४. | स्टुडंट फंड | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ५. | ध्वज निधी | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| ६. | आपत्कालिन निधी | १० | १० | १० | १० | १० | १० |
| | एकूण | ३५ | ३५ | २७५ | ३५ | ३५ | ३०५ |
| | **इतर फी** | | | | | | |
| १. | कॉम्प्युटर ॲण्ड इन्टरनेट फी | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २. | ओळखपत्र | ५० | ५० | ५० | - | - | - |
| ३. | अंतर्गत परीक्षा | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० |
| | | ४५० | ४५० | ४५० | ४०० | ४०० | ४०० |
| | एकूण : | ४८५ | ४८५ | ७२५ | ४३५ | ४३५ | ७०५ |

रयत शिक्षण संस्थेचे

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

## इयत्ता ११ व १२ वी चे वार्षिक नियोजन खालीलप्रमाणे राहील.

| अ.नं. | महिना | इयत्ता ११ वी | इयत्ता १२ वी |
|---|---|---|---|
| १) | ऑगस्ट | घटक चाचणी क्र. १-२५ गुण | मध्यसत्र परीक्षा-५० गुण |
| २) | ऑक्टोबर | पहिली सत्र परीक्षा-५० गुण | सहामाही परीक्षा ५० गुण सक्तीची लेखी आरोग्य व शारीरिक शिक्षण परीक्षा २५ गुण |
| ३) | डिसेंबर | घटक चाचणी क्र. २-२५ गुण | (मध्यसत्र परीक्षा २) ५० गुण सक्तीची आरोग्य व शारिरिक शिक्षण परीक्षा प्राच्यक्षक परीक्षा (२५) |
| ४) | जानेवारी | सक्तीची आरोग्य व शारीरिक शिक्षण परीक्षा प्रात्याक्षिक व लेखी परीक्षा (२५+२५) | सराव परीक्षा |
| ५) | फेब्रुवारी | - | बोर्ड परीक्षा |
| ६) | मार्च/एप्रिल | दुसरी सत्र परीक्षा लेखी ८० गुण, तोंडी २० गुण | - |

* टीप - इ. ११ वी चे वार्षिक नियोजन नवीन बदललेल्या शासकीय धोरणानुसार राहील.



कु. आदित्य मोरे जागतिक डान्स स्पर्धेत प्राविण्य मिळाल्याबद्दल सत्कार करताना मा.प्राचार्य व्हि.एस.शिवणकर



कु.अकुंर साळुंखे कला उत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल सत्कार करताना मा.प्राचार्य व्हि.एस.शिवणकर

रयत शिक्षण संस्थेचे

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

१) रयत शिक्षण संस्थेचे पहिले कॉलेज (स्थापना १९४७)
२) ११ वी आर्टस् ते बी.ए. (१० स्पेशल विषय) एम.ए. (९ स्पेशल विषय). एम.फिल.
३) संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, नियतकालिके यांनी समृद्ध असलेले ग्रंथालय, बुक बँकेची सोय.
४) अनुभवी, तज्ज्ञ व व्यासंगी प्राध्यापक वर्ग.
५) वक्तृत्व, निबंध स्पर्धेसाठी कुशल मार्गदर्शक व मार्गदर्शन.
६) विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय.
७) कमवा व शिका योजनेची सोय.
८) देशी व विदेशी खेळांचे भरपूर साहित्य.
९) कॉलेजची भव्य इमारत, कार्यालय, स्टाफ रूम, जिमखाना, वृक्षवेलींनी नटलेला परिसर.
१०) अभ्यासिकेची सोय.
११) एन.सी.सी., एन.एस.एस. ची सोय.
१२) हुशार, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सवलत.
१३) उत्कृष्ट निकालाची परंपरा.
१४) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक मार्गदर्शन.
१५) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची सोय.(इयत्ता ११, १२ वीसाठी या केंद्राअंतर्गत स्वतंत्र तुकडी)
१६) तीन व्यवसाय अभ्यासक्रमांची सोय.
१७) बारावीसाठी विविध विद्यार्थी प्रकल्प.
१८) गुणवत्ता सुधार प्रकल्प.
१९) बारावीसाठी उन्हाळी वर्ग
२०) शॉर्टटर्म कोर्सची संधी :


| | | |
|---|---|---|
| १) कॉम्प्युटर कोर्स | २) संस्कृत स्पिकिंग वर्ग | ३) इंग्लिश स्पिकिंग कोर्स |
| ४) मेहंदी | ५) ब्युटी पार्लर | ६) लोकर विणकाम |
| ७) भरतकाम | ८) रांगोळी | ९) फ्लॉवर मेकिंग |
| १०) फॅशन डिझायनिंग | ११) क्लॉथ पेंटींग | १२) योगा |

## : कार्यालयाची वेळ :

रविवार व सुट्टीचे दिवस सोडून महाविद्यालय दररोज सकाळी १०.३० पासून सायंकाळी ५.३० पर्यंत उघडे असते.

**: लेखाविभाग (Account Section) :**

सकाळी ११.०० ते २.००


Garden


Administrative Building


लोकनेते मा.रामशेठ ठाकूर यांच्या सोबत चर्चा करताना
मा.प्राचार्य डॉ. व्हि. एस. शिवणकर



लोकनेते मा. रामशेठ ठाकूर भवन

# BEAUTIFUL CAMPUS